स्थानिक गुन्हे शाखा,धुळे
दिनांक ०२/०५/२०१६

## स्थानिक गुन्हे शाखेची उल्लेखनिय कामगिरी

दिनांक ०१/०५/२०१६ रोजी मा.पोलीस अधीक्षक श्री.साहेबराव पाटील यांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर बातमी मिळाली की, मुंबई आग्रा महामार्ग क्रमांक-३ सरवड फाटा जवळ कापडणे फाटयाचे पिकअप शेडचे जवळ एक काळया रंगाची स्कॉर्पीओ गाडी क्रमांक HR-26-AM-7686 उभी असुन त्यात ५/६ इसम संशयीत रित्या बसलेले आहेत अशी माहिती प्राप्त झाली त्यानुसार अपर पोलीस अधीक्षक श्री.चंद्रकांत गवळी व पोलीस निरीक्षक श्री.देविदास शेळके यांच्या देखरेखी खाली फरार व पाहिजे आरोपी पकडण्यासाठी नियुक्त केलेले पोउनि श्री.नासिर पठाण, पोहवा-सुशिल देसले, पोहवा-मोहिसीनोद्यीन काझी,पोहवा-देवेन्द्रसिंग परदेशी, पोहवा-चुनिलाल सैंदाणे,पोना- मुख्तार शेख,पोना-संदीप थोरात,पोना-प्रभाकर ब्राम्हणे,पोना-नितीन चव्हाण, पोकॉ-प्रविण पाटील,पोना-संजय पाटील, पोकॉ-दिपक पाटील,चापोकॉ-विलास पाटील यांचे पथक गस्त घालत असतांना पोलीस अधीक्षक साहेबराव पाटील यांनी थेट त्यांना संशयीत वाहन चेक करणेबाबत आदेशीत केले त्यानुसार नमुद पथकाने क्षणाचा विलंब न करता थेट घटनास्थळी पोहोचुन संशयीत वाहन व त्यातील इसमांना त्यांनी काही हरकत करायचे आंत तपासणी केली असता इसम नामे (१) संजीत प्रभात बर्मन वय-३२ रा.B/११७ गल्ली नं-१ सादीदपुर दिल्ली-९४ क्रावलनगर पोलीस स्टेशन मुळ गांव-गांव शारोदानंदपुल्ली पोस्ट थाना-फालाकाटा जि.जलपायीगुडी-७३५२११ (प.बंगाल) (२)महम्मद सलीम बाबूखान वय-३८ व्यवसाय-कार चालक रा.घर नं. ५७१, ग.न.३, नबीकरीम, पहाडगंज,अमरपुरी क्रिष्णाबस्ती नवी दिल्ली (३) शिवकुमार ऊर्फ टिंकू महेद्रपाल लाम्बा वय-२८ व्यवसाय-टॅक्सी ड्रायव्हर रा.८५/१३,गन.४ ,क्रिष्णावाली गल्ली, मोजपूर, सादरा पुरानी दिल्ली (४) शेख ईस्त्राईल सगीर वय-३५ व्यवसाय -रिक्षा ड्रायव्हर रा. गाजीयाबाद पुजा कॉलनी, खुशाल पार्क,नवी दिल्ली मुळ रा.गांव पुखडीया पो.मदनपुर जि. अरडीया (बिहार) (५) मंजुर अबुल शेख वय-२८ व्यवसाय-मजुरी रा.सोनीया विहार घर नं-२१ पहिला पुस्ता पुरानी दिल्ली-९४ यांची अंगझडती घेता त्यांचे कब्जात एकुण **३,७०,०७५/-** रुपयाचे एक स्कार्पीओ वाहन,गावठी बनावटीचे पिस्तुल,जिवंत काडतुस,धारदार चाकु,भाला व रोख रुपये,मोबाईल मिळुन आले.

पकडलेले आरोपी हे काहितरी मालाविरुध्दचा मोठा बेत आखुनच धुळे कडेस अथवा महामार्गावर शस्त्रांसह आलेले आहे.याबाबत सखोल चौकशी केली जात असुन अवैध शस्त्रे बाळगल्याबाबत देखिल चौकशी करण्यात येत आहे. एकंदरीत आरोपीतांकडे गावठी पिस्तोल मिळुन आल्याने त्यांचा नेमका हेतु काय असावा या दिशेने त्यांचेकडेस सखोल चौकशी केली जात असुन नमुद टोळी कोल्हापुर जिल्हयात शाहुपुरी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अपराध क्र-२५०/२०१५ भादवि कलम ३७९ प्रमाणेच्या गुन्हयात वॉन्टेड आहे त्याचप्रमाणे त्यांनी नागपुर व उस्मानाबाद या ठिकाणी देखील गुन्हे केल्याचे समजुन आले आहे.यावरुन सदरची टोळी ही आंतरराज्य गुन्हे करणारी टोळी असल्साचे निदर्शनात येत आहे.नमुद आरोपीतांविरुध्द सोनगीर पोलीस ठाण्यात भाग-५ अपराध क्रमांक ४०/२०१६ भादवि कलम ३९९, ४०२ सह भारतीय हत्यार अधिनियम-१९५९ चे कलम ३ व ४ चे उल्लंघण २५ प्रमाणेचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.